LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १२ जून, १९५७ | अंक २४

## विविध माहिती

**निर्वासितांसाठी उद्योगधंदे**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांना कामधंदा पुरविण्यासाठी नवीन उद्योगधंद्यांची स्थापना भारताच्या पूर्वेकडील राज्यांत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें १ कोटी, ४४ लाख रुपयांची रकम मंजूर केली आहे. एकूण रकमेपैकी १ कोटी, २० लाख रुपये बंगाल सरकारच्या हवाली करण्यांत येणार आहेत.

**आंधळ्यांची शाळा**—उत्तर प्रदेश सरकारनें आंधळ्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी एक संस्था स्थापन केली आहे. चालू आर्थिक वर्षांत ५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत येणार आहे. गरीब विद्यार्थ्यांना मासिक २० रुपये भत्ता म्हणून देण्यांत येईल. लखनौ येथें स्थापन केलेल्या ह्या संस्थेसाठी ९१,००० रुपये खर्च आला.

**पाकिस्तानांतील मच्छीमारीला मदत**—पाकिस्तानांतील मच्छीमारीच्या धंद्याला मदत म्हणून अमेरिकेनें १० लाख डॉलर्सची मदत देण्याचें कबूल केलें आहे. ह्या रकमेंतून जरूर तें साहित्य विकत घेण्यांत येईल. त्याचप्रमाणें, तज्ज्ञांचा सल्लाहि मिळेल. परकीय हुंडणावळ मिळविण्यासाठीं पाकिस्तानचा हा प्रयत्न आहे.

**वाहतुकीसाठी नवी बोट**—हिंदुस्थान शिपयार्ड कंपनीनें ‘अंदमान’ ह्या नांवाची नवीन बोट बांधून तयार केली आहे. बोटींत उतारूंच्या व मालाच्या वहातुकीची सोय करण्यांत आली आहे. सुमारें ६०० उतारू नेऊं शकणाऱ्या ह्या बोटींत बऱ्याच आधुनिक सोयी करण्यांत आल्या आहेत.

**आंध्र राज्यांत साखरेचे कारखाने**—आंध्र राज्यांतील विशाखापट्टम् जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार साखरेचे दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. प्रत्येक कारखाना रोज ८०० ते १,००० टन ऊंस गाळणारी यंत्रसामुग्री बसविणार आहे. त्याशिवाय, राज्यांत खाजगी मालकीचे ५ कारखाने काढण्याचे परवाने देण्यांत आले आहेत.

**चैनीच्या वस्तूंवरील विक्रीकर**—चैनीच्या वस्तूंवर निरनिराळ्या राज्यांत घेण्यांत येणाऱ्या विक्रीकराच्या दरांत फरक आहे. हा फरक रद्द करून अशा प्रकारच्या वस्तूंवर सर्व राज्यांत समान दरानें विक्रीकर घेण्यांत यावा, अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें केली आहे.

**नेपाळकडून लाकडी खांब**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामीण भागांतील वीजपुरवठ्याच्या योजनांसाठीं खांब लागतील. अशा प्रकारचे लाकडी खांब नेपाळकडून घेण्याच्या वाटाघाटी चालू आहेत.

**कागदाच्या कारखान्याचा विस्तार**—आंध्र सरकारच्या मालकीच्या राजमहेंद्री पेपर मिल्स ह्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. कागदाचे अधिक प्रकार उत्पन्न करण्यासाठी व उत्पादन वाढविण्यासाठीं नवीन यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. कारखान्याचा विस्तार करण्यासाठी २ कोटी रुपये खर्चावे लागतील.

**काश्मीरमधील उद्योगधंदे**—काश्मीरच्या सरकारनें राज्यांतील उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल ५० लाख रुपयांचें असेल. वसूल भांडवल २५ लाख रुपये असेल. त्यापैकी १९ लाख रुपये सरकार स्वतःच घालणार आहे.

**जपान-रशिआ व्यापार**—जपान व रशिआ ह्यांच्यांतील व्यापार पुन्हां सुरू करण्यासाठी प्राथमिक वाटाघाटी करण्याचें उभयतां देशांनीं ठरविलें आहे. रशिआंतील आर्थिक परिस्थितीचें अवलोकन करण्यासाठी जपानमधून एक तज्ज्ञांचें मंडळ रशिआच्या दौऱ्यावर जाणार आहे. रशिआनें जरूर ती परवानगी दिली आहे.

**परदेशीय हुंडणावळीची अडचण**—मद्रास राज्यांतील जलविद्युत् उत्पादन करणाऱ्या केंद्रांना लागणारी यंत्रसामुग्री परदेशांहून मागविण्याच्या कामीं हुंडणावळीची अडचण भासत आहे. त्यामुळें कांहीं केंद्रांचें काम स्थगित झालें आहे. मद्रास राज्य सरकारनें ६० लाख रुपयांची विजेची यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी भारत सरकारकडे परवान्याची मागणी केली आहे.

**कामाची कंत्राटी पद्धत बंद**—केरळ सरकारनें आपलीं बांधकामें कंत्राटी पद्धतीनें करवून घेण्याचें धोरण रद्द केलें आहे. त्याऐवजीं कामगारांच्या सहकारी संस्थांना हीं कामें देण्यांत येणार आहेत. नव्या धोरणास अनुसरून सरकारनें तीन मैल लांबीचा कालवा खणण्याचें काम अशाच एका सहकारी संस्थेकडे सोंपविलें आहे.

**व्यापारावरील बंदी उठली**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें चीनशीं व्यापार करण्याबाबत ब्रिटिश व्यापाऱ्यांवर जीं बंधनें होतीं तीं रद्द करण्याचा कायदेशीर हुकूम काढला आहे. तथापि सोव्हिएट राष्ट्रगटांत जो माल परवान्याशिवाय पाठवितां येत नाहीं तो माल चीनला पाठविण्यासाठी अजूनहि परवाना घ्यावा लागेल.

**उत्तर प्रदेशांत धान्याची टंचाई**—उत्तर प्रदेश हें राज्य सामान्यतः आपल्या गरजेपेक्षा अधिक धान्य पिकविणारें आहे. परंतु ह्या वर्षी राज्यांतील गव्हाच्या पिकांत १५ टक्के घट झाली आहे. त्यामुळें मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारला १५,००० टनाऐवजीं २२,००० टन गहूं पुरविण्याचें मान्य केलें आहे.

## किंमतीच्या निर्देशांकांचा संसारांत उपयोग

### बेगडी प्रतिष्ठेचे बळी कमी कसे होतील ?

**आपल्या उत्पन्न–खर्चाची वरचेवर विवेकपूर्व छाननी केली आणि इतरांच्या बेगडी रुबाबाची पर्वा बाळगली नाहीं, तर जरुरीच्या खर्चास वाव उरेल आणि घरोघर उडणारे खटके कमी होतील. करवाढ आणि लग्नसराई ह्यांच्या निमित्तानें श्री. वा. काळे ह्यांनीं केलेली चर्चा.**

"भारतांतील घाऊक किंमतींचा निर्देशांक गेल्या महिन्यांत एक टक्क्यानें वाढून तो ४२१ वर आला. गेल्या वर्षीच्या त्याच महिन्यांतील निर्देशांकाशीं तुलना करतां तो ९ टक्क्यांनीं अधिक होता." अशा स्वरूपाची माहिती सरकारच्या आर्थिक सल्लागाराच्या कचेरीमार्फत दरमहा प्रसिद्ध केली जाते व ती वृत्तपत्रांतून छापून येते. हे निर्देशांक बऱ्याचशीरपणें प्रसिद्ध होतात पण त्यांच्याकडे ज्याप्रकारें लक्ष द्यावयास पाहिजे, तसें लोक देत नाहींत असा अनुभव आहे. वास्तविक, घरां–घरांतून त्यांचा उपयोग केला जाणें अगत्याचें आहे. ऑगस्ट १९३९ अखेर संपलेल्या वर्षी सर्व प्रकारच्या मालाची घाऊक किंमत १०० रुपये मानली, तर १९५२–५३ मध्यें ती ३८० रुपये, १९५५–५६ मध्यें ३६० रुपये व १९५६–५७ मध्यें ४१४ रुपये झाली होती. म्हणजे, महागाई त्याप्रमाणें वाढत गेली.

१९३९ मध्यें एकाद्याला १०० रुपये पगार असला व तो १९५६–५७ मध्यें ४१४ रुपये झाला, तर वाढलेल्या निर्देशांकांवरून दिसून येणारी महागाई त्याला विशेष जाणवणार नाहीं. कारण, महागाईच्या प्रमाणांत त्याची प्राप्तीहि वाढली आहे. खर्च वाढला तर खिशांत पैसेहि अधिक असल्यानें तो खर्च भागूं शकला. प्राप्तींतून बचत मात्र झाली नाहीं.

### घरोघर उडणारे खटके

वाढत्या महागाईच्या प्रमाणांत ज्यांची प्राप्ति वाढली आहे, असे लोक विरळाच. थोडी प्राप्ति वाढली असली तरी प्राप्ति व खर्च ह्यांचें प्रमाण बिघडत गेलें आहे आणि त्यावर उपाय म्हणजे खर्च कमी करणें व प्राप्ति आणखी वाढविणें हाच आहे. ह्या दोन्ही मार्गांचा अवलंब करूनहि परिस्थिति आटोक्यांत येत नाहीं, त्यामुळें घरच्या उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी होत नाहीं. कोणता खर्च आणखी कमी केला पाहिजे हें ठरवितां व त्याप्रमाणें वागतां न आल्यानें घरोघर खटके उडतात व कटुता निर्माण होऊन महागाईला तोंड देणें मानसिक दृष्ट्या अधिकाधिक बिकट होत जाते.

चालू लग्नाच्या मोसमांत आहेर देण्याचे अनेक प्रसंग आले तेव्हां ह्या प्रश्नाची विवेकच्या घरीं झालेली चर्चा मोठी उद्बोधक होती. विवेकच्या पुतणीचा विवाह ठरला, तेव्हां साहजिकच तिला आहेर काय करावा याविषयीं बोलणें निघालें. विवेकनें १० रुपयांचा आहेर पुरे, असें सांगितलें. तेव्हां त्याच्या पत्नीला तें पसंत पडलें नाहीं. विमलच्या लग्नाच्या वेळीं आपण २० रुपयांचा आहेर केला होता; आतां तिच्याच बहिणीला १० रुपयांचा आहेर करून कसें चालेल ? असें तिला साहजिकच वाटत होतें.

### आहेराचा विचार हाच अविचार

विवेक घाऊक किंमतींच्या निर्देशांकांचा तक्ता पुढें ठेवून म्हणाला, "विमलचें लग्न झालें तेव्हां निर्देशांक ३५० होता; आतां तो ४२५ झाला आहे. म्हणजे, त्यावेळेच्या मानानें आतां २१ टक्के महागाई जास्त आहे. आपली प्राप्ति जवळ जवळ कायमच आहे; पण आपल्या मुलांच्या संख्येंत भर पडली आहे, शाळांची फी वाढली आहे, भाडें दीडपट झालें आहे, सर्वच खर्च एकसारखे वाढत आहेत. तेव्हां, खरं म्हटलं तर,आहेर देण्याची सुद्धां आपली ऐपत उरलेली नाहीं. धान्य, सरपण, घरभाडें, दूध, ह्यांत कांहीं बचत करतां येत नाहीं. तेव्हां, पूर्वीच्या मानानें लहान आहेर केला तरच कांहींतरी तरणोपाय आहे. आपल्या सुधीला पोहायला शिकवायचं होत, तें सुद्धां मे महिन्यांत खर्च फार होतो म्हणून आपण रद्द केलं. बाळयाला शब्दकोश घेऊन द्यायचा आहे, तो आपण पुढें पुढें ढकलीत आहोंत आणि नवसाचा सत्यनारायणसुद्धां आपल्या हातून पार पडलेला नाहीं. अशा परिस्थितींत आहेराचा विचार हाच अविचार होय."

विवेकचें मन परिस्थितीनें जितकें घट्ट केलें होतें, तेवढें त्याच्या पत्नीचें झालें नव्हतें. त्यामुळें ती एकसारखी "पण, पण" करीत राहिली. अखेर तिला विवेकचें म्हणणें पटलें. कारण, तेवढ्यांतच आणखी एका लग्नाची वर्दी आली व त्याला तर परगांवीं जाणें जरूरीचें होतें ! कौटुंबिक बजेटांत हे खर्च आतां बसूंच शकत नाहींत, त्यामुळें घरखर्चाला विलक्षण ताण पडतो आणि त्या बाबतींत लेचेपेचेपणा उपयोगाचा नाहीं हें तिला समजून चुकलें. एकदां धोरण ठरल्यानंतर, थोडा खर्च इकडे तिकडे जास्त झाला, तरी परिस्थिति आवाक्याबाहेर फारशी जात नाहीं.

### वरचेवर तपासणीची आवश्यकता

आहेरावरून हा प्रश्न निघाला म्हणून त्याचा जरा प्रदीर्घ उल्लेख केला. परंतु, ही विचारसरणी सर्वच खर्चांच्या बाबतींत लागू केली पाहिजे. भाजी महागली कीं, आपण ती घेण्याचें टाळतों किंवा कमी करतों, तोच नियम इतर खर्चांच्या बाबतींत अमलांत आणतां आला पाहिजे. पण तें अतिशय अवघड जातें. प्रत्येक बाब स्वतंत्रपणें पाहिली, तर लहान वाटते. जेथें काटकसर केली जात नाहीं, अशा बाबींची संख्या मोठी असते व त्या सर्वांचा एकत्रित हिशेब केला म्हणजे डोकें फिरण्याची पाळी येते. एका वेणीचा किंवा एका सिंगलच चहाचा किंवा आइस्क्रीमचा हा प्रश्न नाहीं. उत्पन्नाच्या मानानें आपण खर्च वाढूं देत नाहींना; त्यासाठी अनावश्यक खर्च चालू ठेवून जरुरीच्या खर्चांस मात्र कात्री लावीत नाहींना, हें वरचेवर तपासून पाहण्याचा हा प्रश्न आहे.

### प्रतिष्ठा परवडली पाहिजे

खोट्या प्रतिष्ठेला बळी पडून, कालच्या पद्धतीनें ओझं चालून, विचारापेक्षा विकाराला महत्त्व देऊन चालणार नाहीं. ह्याचा अर्थ, प्रतिष्ठेला महत्त्व नाहीं, असें मुळींच नाहीं. पण ती परवडली पाहिजे, एवढेंच येथें सांगण्याचा उद्देश आहे. उत्पन्नाची बाजू वाढविणें आपल्या हातांत फारसें नसतांना खर्चाची बाजू तरी आवाक्यांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतरांच्या बेगडी रुबाबाची आपण पर्वा करतां कामा नये. मध्यमवर्गीयांत तरी डामडौलासाठी खर्च कमी करणाराच कुटुंबाचें खरें हित साधीत असतो. प्रवाहपतितांना वाटत असते कीं ते समाजांतील त्यांची मान्यता कायम राखीत असतात. पण त्यांपैकी कित्येकांच्या मुलांचे परीक्षांचे निकाल त्यांची फी भरली गेली नाहीं म्हणून तहकूब ठेवलेले असतात ह्याची टोचणी त्या बिचाऱ्या बालकांना किती नाउमेद करीत असते आणि इकडे त्यांचे पालक सामाजिक प्रतिष्ठेसाठी दुकानदारांना उधारीसाठी विनवण्या करीत हिंडत असतात !

—श्री. वा. काळे

"केसरी," २६–५–५७

# अर्थ

बुधवार, ता. ११ जून, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बदल करणें धोक्याचें ठरेल

भारताच्या सरकारनें चालू सालचें अंदाजपत्रक लोकसभेंत सादर केल्यावर त्यामधील करविषयक सूचनांबद्दल सभागृहांत व बाहेरहि बरीच प्रतिकूल टीका करण्यांत आली. जाचक कर बसविण्यापेक्षा पंचवार्षिक योजनेचा पूर्तिकाल वाढविण्यांत यावा अशीहि एक सूचना करण्यांत आली. ह्या विषयासंबंधीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे जनक आणि भारत सरकारचे सल्लागार आकडे-शास्त्रज्ञ डॉ. महालनविस ह्यांनीं आपले विचार प्रकट केले आहेत.

डॉ. महालनविस म्हणतात कीं दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी करावयाचा असेल तर लोकांच्या उत्साहशक्तीला जागृत केलें पाहिजे आणि त्यांची जबाबदारीची जाणीवहि जागी केली पाहिजे. कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या मार्गांत कांहीं मूलभूत अडचणी अगर भौतिक अडथळे आहेत असें नाहीं. परदेशीय हुंडणावळीची टंचाई आहे हें खरें; पण ही उणीव देशांतर्गत उत्पादन वाढवून भरून काढतां येईल. कार्यक्रम यशस्वी करण्याची हीच गुरुकिल्ली आहे. देशांतील लोकांवर कांहीं काल चांगलाच ताण पडेल. परंतु संकल्पित नवे कारखाने उभारले गेल्याबरोबर आपली साधनसामुग्री वाढूं लागेल आणि ती तशी वाढली म्हणजे बेकारीचा प्रश्न कांहीं प्रमाणांत सुसह्य होऊं लागेल. भारताजवळ नैसर्गिक साधनें विपुल प्रमाणांत आहेत आणि कामधंदा नसणारे बेकार लोकहि आहेत. म्हणूनच परदेशीय हुंडणावळीच्या गरजेपासून अधिकाधिक प्रमाणांत मुक्त होणें भारताला शक्य आहे. भारतानें आपल्या करांच्या पद्धतींत आमूलाग्र बदल केलेला आहे. त्यावरून भारत हा आपला कार्यक्रम तडीस नेण्याच्या निश्चयानें उभा आहे, अशी जगाची खात्री झाली पाहिजे.

पंचवार्षिक कार्यक्रमांत आतां फेरबदल करण्यानें परिणामतः कार्यक्रम अंमलांत आणण्यापेक्षांहि अधिक ताण देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडेल. कारण भांडवल गुंतविण्याचा आपला वेग आपण वाढवूं शकलों नाहीं तर देशांतील बेकारी वाढेल व समाजाच्या सर्वच थरांत अधिक दैन्यावस्था निर्माण होईल. प्रगतीचा वेग जलद ठेवणेंच इष्ट आहे. नाहीं तर बेकारीचा प्रश्न कसा सुटेल हें समजणें अशक्य आहे. म्हणून आपण आपलें उत्पादन, म्हणजेच पर्यायानें आपले उद्योगधंदे झपाट्यानें वाढविले पाहिजेत. ह्या दृष्टीनें विचार करतां भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं सुचविलेली करवाढ मोठी धैर्याची आहे. वाढत्या करांच्या शिफारशीमुळें पंचवार्षिक कार्यक्रमांत बदल घडवून आणण्याचें कांहीं कारण नाहीं. समजा, उद्यां उद्योगधंद्यांत मंदीची लाट आली तरी समाजांतील श्रीमंत वर्ग सुखासमाधानानें नांदूं शकेल. अशा वेळीं बेकारीच्या भयप्रद प्रश्नाला तोंड देण्यासाठीं करांची आवश्यकता आहेच. त्याशिवाय हा प्रश्न सह्य होणारच नाहीं. पंचवार्षिक कार्यक्रम तडीला नेण्यासाठी देशांतील धान्याचें उत्पादन वाढविणें मात्र अगत्याचें आहे. धान्याचें उत्पादन वाढल्याशिवाय कार्यक्रम यशस्वी करणें अवघड आहे. पण ह्या संबंधी जे उपाय योजण्यांत आले आहेत, त्यामुळें उत्पादन वाढेल अशी आशा आहे.

---

## हुंडणावळीच्या अडचणीचा सहकारी कारखान्यांना फटका ?

भारत सरकारच्या परराष्ट्रीय येण्या-देण्याची परिस्थिति असमाधानकारक होत चालली असून, निर्गत न वाढतां आयात भरमसाट वाढत चालली आहे. सहाजीकच, आयातीवर शक्य तेवढीं नियंत्रणें ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न चालू आहे. ह्या परिस्थितीचा तडाखा कित्येक सहकारी साखर कारखान्यांना बसणार आहे. यंत्रसामुग्रीच्या आयातीसाठीं आवश्यक ती पूर्वतयारी करून व मशिनरीची ऑर्डर नोंदवल्यावर, आयातीचा परवाना वेळेवर हातीं न येण्याचा प्रकार घडून सहकारी कारखाने अडचणींत सांपडले आहेत. परदेशी हुंडणावळीवरील ताण कमी करण्यासाठीं, मशिनरीच्या आयातीची किंमत तात्काळ देऊन टाकण्यास मध्यवर्ती सरकारचा विरोध आहे. हें देणें कांहीं वर्षांवर विभागून तें लांबणीवर टाकावें असा त्याचा आग्रह आहे. त्यामुळें, मशिनरीच्या कारखानदारांकडील साखर कारखान्यांची पत कमी झाली आहे; विलंबामुळें मशिनरीच्या कारखानदारांची जी नुकसानी होईल, ती भरून मिळावी अशी त्यांची मागणी आहे. मशिनरीची किंमत हप्त्यानें ते घेण्यास तयार आहेत, पण बाकी रकमेवर त्यांना भारी दरानें व्याज हवें आहे. अशा रीतीनें, भारत सरकारच्या हुंडणावळविषयक अडचणीमुळें, कित्येक नव्या सहकारी साखर कारखान्यांना पांच-सात लक्ष रुपयांचा जादा खर्च सोसावा लागणार आहे; ज्यांची मशिनरी आधींच आली असेल त्यांची गोष्ट वेगळी. हा जादा खर्च कोणी सोसावयाचा, असा प्रश्न सहाजिकच उपस्थित झाला आहे. तयार होणाऱ्या साखरेंतूनच त्या खर्चाची अखेर भरपाई करावी लागेल; आणि त्याचा बोजा गिऱ्हाइकावर टाकतां आला नाहीं, तर तो ऊंस विकणाऱ्या शेतकऱ्याला सहन करावा लागेल. पण हा पुढचा प्रश्न आहे. ह्या जादा खर्चाची व्यवस्था कोणी व कशी करावयाची, हाच तांतडीचा प्रश्न आहे.

---

**रशिआ व इजिप्त ह्यांच्यांतील सागरी वहातूक**—रशिआ व इजिप्त ह्यांच्या दरम्यान थेट सागरी वहातूक सुरू झाली आहे. ओडेसा ते अलेक्झांड्रा ह्या बंदरांच्या दरम्यान एक रशिअन बोट महिन्यांतून तीनदां जा-ये करील. उभयतां देशांत थेट सागरी वहातूक पहिल्यानेंच सुरू होत आहे.

**साखरेच्या किंमतींत वाढ**—अंदाज-पत्रकांतील अबकारी कर जाहीर झाल्याबरोबर मुधोळ येथें साखरेची किंमत ९५ रुपये पोत्यावरून ११७ रु. पर्यंत चढली. परंतु एका सामाजिक कार्यकर्त्यानें सांगलीहून साखर मागवून ती खरेदीच्या किंमतींत विकली. त्यामुळें साखरेची किंमत कांहीं प्रमाणांत खाली आली.

## मालाच्या घाऊक किंमतींचा निर्देशांक

**वाढती महागाई**

ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष = १००
१९५५–५६ चा सरासरी निर्देशांक = ३६०.४
१९५६–५७ चा सरासरी निर्देशांक = ४१४.०
१८ मे, १९५७ अखेरच्या आठवड्याचा निर्देशांक = ४३४.६

भारतांतील मालाच्या घाऊक किंमतींचा अधिकृत निर्देशांक (मूळ प्रमाण : ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष = १०० धरून) १९५५–५६ मध्यें वाढत चालला होता व ही परिस्थिति डिसेंबर १९५६ अखेरीला संपलेल्या पुनर्विलोकनाच्या वर्षांतहि पुढें चालू राहिली.

तथापि ही वाढ होण्याचें प्रमाण मात्र १९५५–५६ पेक्षा कमी होतें. एप्रिल, १९५५ चा निर्देशांक ३४५.५ होता तो मार्च, १९५६ मध्यें ३८७.४ वर गेला. डिसेंबर, १९५६ मध्यें यांत आणखी वाढ होऊन तो ४२८.८ वर गेला. परंतु त्यानंतर या निर्देशांकांत घट होऊन वर्षअखेर तो ४२१.३ वर आला. १९५५–५६ मध्यें या निर्देशकांत १२.२ टक्के वाढ झाली होती तर १९५६–५७ मध्यें वाढीचें प्रमाण ७.७ टक्के होतें.

१९५६–५७ चा सरासरी निर्देशांक ४१४.० म्हणजे गेल्या वर्षीच्या ३६०.४ या सरासरी निर्देशांकापेक्षा १५ टक्के जास्त आहे. सर्वांत जास्त वाढ 'अन्नपदार्थ' गटांत झाली. या गटाचा निर्देशांक २४ टक्क्यांनीं वाढून ३८८.५ टक्क्यांवर गेला, तर 'औद्योगिक कच्चा माल', 'अर्ध-पक्का माल', 'पक्का माल' व 'संकीर्ण वस्तू' या गटांचे निर्देशांक अनुक्रमें २०, १९, ३ व २ टक्क्यांनीं वाढून ५०१.९, ४०२.३, ३८४.६ व ५५९.२ वर गेले.

### गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें १९५७ सालासाठी पुढील तीन कारखानदारांना गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें जाहीर केली आहेत:—

| कारखानदार | कशाबद्दल | रकम रुपये |
|---|---|---|
| (१) ऑल इंडिया स्पोर्टस इंडस्ट्रीज, पुणें. | "टेनिस गटस" | १०० |
| (२) पराडकर अँड सन्स, कोल्हापूर. | "इलेक्ट्रिक स्विचगीअर स्टार्टर" | १०० |
| (३) लुनर कॉस्टिक प्रायव्हेट लि. पुणें. | "निगेटिव्ह फोलोडिन, आयोडायझर व कॅडमिअम सल्फाईड" | १०० |

हीं पारितोषिकें देण्याचा समारंभ रविवार दि. १६ जून १९५७ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां चेंबरच्या ओगले सभागृहांत होईल.

**बंद गिरणी ताब्यांत घेतली**—त्रिवेंद्रम् येथील कापडाची बंद पडलेली एक गिरणी राज्य-सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे. गिरणी चालविण्यासाठी सरकार आतां एक औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करणार आहे. ह्या संस्थेला गिरणी चालविण्यासाठी जरूर असणारें खेळतें भांडवलहि सरकार पुरविणार आहे.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

**—शेड्यूल्ड बँक—**

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्ज मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाच्या दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

(१) सदाशिव पेठ, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४९५ रविवार पेठ, पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी–पुणें २.

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे श्री. मा. वी. शहा
श्री. फ. दो. पदमजी श्री. भा. म. गुते
श्री. म. बा. जांभेकर श्री. म. स. पारखे

वाढविलेले व्याजाचे दर

सेव्हिंग्ज बँक ठेवीवर द. सा. द. शें. रु. २
मुदतीच्या ठेवी—१ ते २ वर्षे रु. ३, ३ वर्षे रु. ३। व ५ वर्षे रु. ३॥

रकमा सुरक्षित गुंतवून आकर्षक व्याज मिळवा.

बँकेच्या शाखा

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, भिवंडी, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर (फलटण गल्ली व मुरारजी पेठ), श्रीरामपूर व ठाणें.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## गोकाक फॉल्स शाखेचा उद्घाटनसमारंभ





पहिल्या चित्रांतः—मुख्य पाहुणे श्री. हार्डी हे फीत कापून ब्रँच ऑफिसचे उद्घाटन करितात.

दुसऱ्या चित्रांतः—बँकेतर्फे डायरेक्टर श्री. गोविंदराव सराफ स्वागतपर भाषण करतांना, शेजारी चेअरमन श्री. हेरेकर व मि. व मिसेस हार्डी.

दि बेळगांव बँक लि.च्या गोकाक फॉल्स शाखेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, ता. ३१ मे रोजीं सायंकाळीं ५–३० वाजतां गोकाक मिल्सचे जनरल मॅनेजर श्री. हार्डी यांच्या हस्तें मोठ्या उत्साहानें पार पडला. या समारंभासाठी बेळगांवहून बँकेचे चेअरमन श्री. मधुकरपंत हेरेकर, व्हाइस चेअरमन श्री. देशपांडे, डायरेक्टर्स श्री. गोविंदराव सराफ, मुत्तूर, शिराळी, मॅ. डायरेक्टर श्री. नाईक, मॅनेजर श्री. कुलकर्णी व बँकेचे इन्स्पेक्टर श्री. कामत, तसेंच गोकाक, नरगुंद व तालीकोटी येथील प्रमुख व्यापारी मुद्दाम आले होते. याशिवाय सौ. हार्डी, मिल्सचा अधिकारी व नोकरवर्ग बहुसंख्येनें उपस्थित होता.

### श्री. गो. वि. सराफ ह्यांचें प्रास्ताविक भाषण

बँकेतर्फे सर्वांचें स्वागत करून डायरेक्टर श्री. गोविंदराव सराफ म्हणाले कीं, आपल्या विस्तृत देशांत बँकिंगचा प्रसार सर्व ठिकाणीं झाल्याशिवाय सरकारच्या पंचवार्षिक योजना सुलभतेनें पार पडणें शक्य होणार नाहीं. रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें या दृष्टीनेंच इंपीरियल बँकेचें राष्ट्रीयीकरण करून स्टेट बँकेची स्थापना करण्याची व तिच्या निदान ४०० तरी नव्या शाखा लगेच उघडण्यांत याव्या अशी शिफारस केली, व सरकारनें ती लगेच अंमलांत आणली हें आपणांस माहीत आहेच. परंतु शाखा-विस्ताराचें हें काम इतकें व्यापक आहे कीं, केवळ स्टेट बँके-कडून हें काम पार पडणें शक्य होत नाहीं. त्यासाठी इतर बँकांनाहि त्या कामीं आपला वांटा उचलला पाहिजे. घटप्रभेच्या धरणामुळें जशी गिरणीला विद्युत्‌शक्ति व शेतीला पाणीपुरवठा होत आहे त्याप्रमाणें बँकांमुळें देशांतील बचतशक्ति वाढून उद्योगधंदे व विकासयोजना यांना मदत मिळते. आपल्या बँकेची गोकाक शहरांत गेलीं १५ वर्षें शाखा चांगल्या प्रकारें चाललीं आहे. परंतु मिळच्या आवारांत बँकेची जरूरी भासत असल्यामुळें आज ही शाखा उघडून जनतेची सेवा करण्यांत आम्हांस विशेष आनंद वाटत आहे.

यानंतर गोकाकच्या व्यापारी वर्गातर्फे श्री. बी. एस. मुनवळ्ळी यांनीं भाषण करून बेळगांव बँकेचें कार्य कसें उपयुक्त होत आहे, हें सांगितलें.

### श्री. हार्डी ह्यांचें भाषण: परगांवच्या व्यापारी वर्गाची विशेष सोय

मुख्य पाहुणे श्री. हार्डी यांनीं बँकेचें उद्घाटन केल्याचें जाहीर करून सांगितलें कीं, बेळगांव बँकेच्या गोकाक शाखेचा उपयोग व्यापारी व मिलसचे नोकरवर्ग यांना आजपर्यंत होत आहे, तरी मिलसच्या आवारांत ही नवीन शाखा उघडल्यामुळें परगांवच्या व्यापारीवर्गाची सोय होईल हें पाहून मला फार आनंद होत आहे. या बँकेच्या निरनिराळ्या बचतयोजना आकर्षक असून नोकरवर्गाला त्या उपयुक्त होतील याचा मला विश्वास वाटतो. बँकेच्या स्टाफसाठी राहण्यास सोय लवकरच कामगारांच्या चाळी बांधण्याचे वेळीं होऊं शकेल असेंहि त्यांनीं आश्वासन दिलें.

श्री. आर. व्ही. कुलकर्णी, गोकाक शाखेचे एजंट, यांनीं सर्वांचे आभार मानले व अल्पोपहारानंतर समारंभ आटोपला.

बेळगांव बँकेची ही २५ वी शाखा होय.

---

**सांथीचा वाहतुकीवर परिणाम**—गेल्या आठवड्यांतील इन्फ्लुएंझाची सांथ पसरल्यामुळें मुंबई शहराच्या बस-वहातुकीवर परिणाम झाला. कंपनीचे ६०० वर कंडक्टर्स व ड्रायव्हर्स आजारी पडल्यामुळें ५६ बसगाड्या तबेल्यांतच पडून राहिल्या. मुंबईत रोज ७२७ बस गाड्या उतारूंची वहातूक करीत असतात.

**सक्तीचें प्राथमिक शिक्षण**—भारत सरकार ज्या प्रदेशांतील कारभार स्वतःच चालवीत आहे त्या प्रदेशांतून ६ वर्षांवरील वयाच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याचा विचार चालू आहे. दिल्ली, हिमाचल प्रदेश, त्रिपुरा हे प्रदेश भारत सरकारच्या कारभाराखालीं आहेत.

## बँक मॅनेजर्स व शाखाप्रमुख यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट्सचे अधिकार द्या

मुखत्यारपत्रें व प्रतिज्ञित जबाब (पॉवर ऑफ ॲटर्नी व ॲफिडेव्हिट्स) तयार करण्यांत आणि त्याचप्रमाणें अधिकृत व्यक्तींचे समक्ष महत्त्वाच्या कागदपत्रांवर सह्या करून तसा शेरा त्या कागदपत्रांवर घेण्यांत सर्वसामान्य जनतेला येणाऱ्या अडचणी अद्याप दूर झालेल्या नाहींत. सरकारनें ह्या कामासाठी अनेक प्रतिष्ठित नागरिकांना ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमून त्यांच्या याद्या जाहीर केलेल्या आहेत ही गोष्ट खरी; परंतु पुढें सरकारनें अशा ऑनररी मॅजिस्ट्रेट यांना शपथ देण्याचा अधिकार नाहीं असें जाहीर केलें. त्यामुळें या ऑ. मॅजिस्ट्रेटांचा उपयोग मर्यादित झाला. शिवाय, नेमलेले बहुतेक ऑनररी मॅजिस्ट्रेट प्रतिष्ठित व मोठ्या मनाचे असले तरी त्यांना नेमक्या ठिकाणीं हुडकून गांठणें त्यांच्या व्यवसायामुळें मुष्किल पडतें. त्यांना पुष्कळ वेळां विशिष्ट कचेऱ्या नसतात. अशाच अनेक कारणांमुळें सध्यां असलेल्या ऑनररी मॅजिस्ट्रेटांच्या जोडीला ठिकठिकाणच्या महत्त्वाच्या बँकांचे प्रमुख व शाखाप्रमुख यांनाहि ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत यावें व त्यांना शपथ देण्याचा अधिकार द्यावा, म्हणजे जनतेची फार मोठी सोय होईल. बँकप्रमुख हे अत्यंत जबाबदारीचीं कामें उरकीत असल्यामुळें व त्यांना स्वतंत्र कचेऱ्या असल्यामुळें त्यांना हें काम प्राविण्यानें करतां येईल अशी खात्री वाटते. —"व्यापारी महाराष्ट्र"

---

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

### ५ लक्ष रु. चे शेअर्स महाराष्ट्र बँकेनें अंडरराइट केले


सिंडिकेटच्या संचालक मंडळानें आपल्या दि. १२ मे, १९५७ च्या सभेंत प्रत्येकीं रु. २५ चें २०,००० ऑर्डिनरी शेअर्स विक्रीस काढण्याचा ठराव केला. हे शेअर्स प्रथमतः चालू भागीदारांना त्यांनीं धारण केलेल्या प्रत्येकीं ५ शेअर्सला १ ऑर्डिनरी शेअर ह्या प्रमाणांत मिळूं शकतील. या रकमेवरील नफ्याची आकारणी १–७–१९५७ पासून त्या नंतर झालेल्या नफ्यांतून करण्यांत येईल. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें सदर २०,००० शेअर्स अंडरराइट करण्याचें कबूल केलें आहे. त्यासाठीं बँकेला २% अंडररायटिंग कमिशन द्यावयाचें ठरलें आहे. सिंडिकेटचे जनक, कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे, ह्यांची पहिली पुण्यतिथि ९ जून, १९५७ रोजीं होती, ती संचालक मंडळानें नवी शेअर विक्री जाहीर करून उत्कृष्ट रीतीनें, औचित्यपूर्ण साजरी केली आहे. सिंडिकेटचे शेअर्स अंडरराइट करून महाराष्ट्र बँकेनें कारखान्यावरील विश्वास प्रकट केला आहे.

### महाराष्ट्र बँकेनें शेअरची राखीव रक्कम मागविली

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या संचालक मंडळानें बँकेच्या विक्री झालेल्या भागांवरील राहिलेली रक्कम मागविण्याचें ठरवून भांडवल वाढविण्याविषयीं ठराव केला व त्यासाठीं आवश्यक ती सरकारी मंजुरी मिळविली. त्याप्रमाणें, ही रक्कम मागविण्याचें ठरवून, ती प्रत्येक शेअरमागें २५ रु. पांच सोइस्कर हप्त्यांत वसूल करण्याचा ठराव संचालक मंडळानें केला आहे, असें समजतें.


खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
जनता बचत योजना
व्याज : $2\frac{1}{2}$ टक्के
शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या शेतीची उपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरीत्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

शिक्षकाचा कारखानदार

## चंद्रशेखर गोविंद आगाशे

परंतु इ. स. १९१७ ते १९२६ पर्यंत शिक्षकाचें काम नऊ वर्षे केल्यावर व पुढें सात-आठ वर्षे वकिलीचा व्यवसाय (तोहि आज उपेक्षितच आहे) केल्यावर कर्तबगार कारखानदार झाल्याचें उदाहरण आपल्या पुण्यांत घडलें आहे. प्रारंभीं शिक्षक, मग वकिली (निदान वकिलीची पदवी मिळविलेले) केलेले ख्यातनाम राजकारणी पुढारी भारताला लाभले. परंतु शिक्षकाचा व्यापारी, कारखानदार, उद्योगपति, झाल्याचीं उदाहरणें महाराष्ट्रांत तरी विरळाच म्हणावीं लागतील. महाराष्ट्रांत शैक्षणिक संस्था स्वार्थत्यागपूर्वक चालविणारांची परंपरा आहे; पण कारखानदारी व उद्योगधंदा-हे मुळांतच महाराष्ट्रीयांत कमी-नव्यानें उभा करून तो यशस्वीपणानें करून दाखवणारे आमच्यांत हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतके तरी सांपडतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. पण अशी एक कर्तबगार व्यक्ति महाराष्ट्रांत नुकतीच होऊन गेली. त्या व्यक्तीचें नांव चंद्रशेखर गोविंद आगाशे. त्यांनीं इ. स. १९१९ मध्यें मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून एलएल्. बी. ची परीक्षा दिली. इ. स. १९३४ पर्यंत भोर संस्थानांत व पुण्यास वकिलीचा व्यवसाय केल्यावर कांहीं मित्रांच्या साह्यानें त्यांनीं साखरेचा कारखाना काढण्याची कल्पना काढली व बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट या महाराष्ट्रीय साखर कारखान्याची स्थापना केली. आज या कंपनीला स्थापन होऊन वीस वर्षे होऊन गेलीं आहेत. एक हजार टन ऊंस गाळतां येईल एवढी यंत्रसामुग्री श्री. आगाशे यांनीं कारखान्यासाठीं आणली, आणि त्यासाठीं भांडवलवाल्यांच्या आसऱ्याला न जातां वैयक्तिक प्रयत्न आणि पत यांच्यावर एवढ्या मोठ्या यंत्रसामुग्रीला लागणारी रकम त्यांनीं उभी केली.

कै. आगाशे यांचा विशेष हा कीं, शैक्षणिक क्षेत्रांतील त्यागबुद्धि व सार्वजनिक निष्ठा त्यांनीं उद्योगधंद्यांत आणून उभी केली. अशीं उदाहरणें महाराष्ट्रांत फार कमी. त्यांत एक उदाहरण श्री. आगाशे होत असें निःसंशयपणें म्हणतां येईल. त्यांनीं कारखान्याचा व महाराष्ट्राचा संसार केला. कारखाना आणि कचेरी हेंच त्यांचें घर होतें.

भगीरथानें कैलासाहून गंगा खालीं आणली तरी तिचा प्रवाह पदोपदीं अडत होता. त्यावर पुनः पुन्हां तपश्चर्या करून त्यानें तो प्रवाह सारखा वाहात ठेवला, अशी जी एक पौराणिक दंतकथा आहे त्या कथेप्रमाणें श्री. आगाशे यांनीं कार्य केलेलें आहे. दि. ९ जून १९५६ रोजीं आकस्मिकपणें हृदयक्रिया बंद पडून श्री. आगाशे हे निधन पावले नसते तर कारखाना अधिक भरभराटीस आणण्याचें श्रेय त्यांनीं मिळविलें असतें. आतां पाठीमागें राहिलेल्यांच्यावर ही एक मोठीच कामगिरी येऊन पडलेली आहे.

स्वतःवर व कुटुंबियांच्यावर कर्जबाजारीपणाच्या हलाहल प्राशनाचा प्रसंग ओढवला तरीहि पर्वा न करितां श्री. आगाशे यांनीं महाराष्ट्राच्या गरिब जनतेला साखरेचें व नफ्याचें गोड अंगापान असंडपणें करविलें आहे!

—डॉ. वा. मो. कानिटकर,
एम्. ए., पीएच्. डी., एलएल्. बी., बी. टी.
(नागरी जीवन, १-६-५७)

होमिओपाथीचें इस्पितळ—परळ भागांत १०० रोग्यांची सोय असणारें एक होमिओपाथिक इस्पितळ बांधण्याचा मुंबई सरकार विचार करीत आहे. सध्यां शिव येथें असें एक इस्पितळ आहे. पण त्यांत फक्त ३० रुग्णांची सोय होऊं शकते. होमिओपाथी पद्धतीचा उपचार घेऊं इच्छिणाऱ्या रोग्यांना तें पुरत नाहीं.


D. E. SOCIETY'S

## Brihan Maharashtra College of Commerce,

POONA 4.

The college will reopen for the academic year on 20th June, 1957. A student who passes the S. S. C. Examination with any seven subjects with *English* as one of the subjects is eligible for admission to the First Year Commerce classes. The Prospectus giving detailed information regarding the courses and rules of admission to the different classes can be obtained from the Office for 50 N. P. Intending candidates should submit the form of admission, along with the admission fee of Rs. 32/- immediately.

Under Ordinance 233-A, Arts graduates with Economics of the Poona University can be admitted to one year's B. Com. degree course with benefit of exemptions in certain subjects.

**T. M. Joshi,**
*Principal.*

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

**594, Budhawar Peth, Poona 2.**

Opens for the 1957-58 session on Friday the 21st June 1957. Students coached up for G. C. D., L. C. C., G. D. C. & A., C. A. I. I. B., D. Com., A. C. W. A., Shorthand, Typewriting. Morning and evening Classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Principal.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

(फक्त सभासदांसाठीं)

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांची चर्चात्मक सभा रविवार दिनांक २३ जून १९५७ रोजीं सायंकाळीं ५-० वाजतां बँकेच्या सभागृहांत होणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सभासदांनीं उपस्थित रहावें अशी विनंती आहे.

पुणें २
दि. ७-६-५७

वा. ग. अळतेकर
कार्यकारी संचालक

# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७८,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. व. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. बा. दुबी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारतें. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,७१,५०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,६२,००० |

--अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. एम. बी. चौगुले, शाहुपुरी–कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

## हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.